नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/१२/२०२५ (शनिवार )**

---

# घरफोडीचे २ उघड, आरोपी अटक
# मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा :—** दिनांक २८/१०/२०२५ रोजी फिर्यादी नामे शिवम प्रभुजी गिरडकर,रा. तारसा यांनी पोलीस स्टेशन मौदा येथे दिनांक २२/१०/२०२५ चे रात्री ०८/०० वा. ते २३/१०/२०२५ चे सकाळी ०६/०० वा. दरम्यान अज्ञात चोरटयानी त्याचे तारसा येथील दुकानाचे शटरचे कुलुप तोडुन दुकानातुन नगदी १५,०००/—रूपये चोरी केल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस ठाणे मौदा येथे अप क्रं ८१५/२०२५ कलम ३३१(४),३०५(अ) भा.न्या.स. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मा. वरीष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात मौदा पोलीस स्टेशन येथील गुन्हे शोध पथकाने गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या अधारे तसेच गुन्हा करण्याची पध्दत या माहीतीच्या आधारे दिनांक ०५/१२/२०२५ रोजी तारसा येथे **राहणारा आरोपी नामे अर्जुन ज्ञानेश्वर हटवार, वय. ३६ वर्ष,रा. तारसा** यास ताब्यात घेतले. नमुद आरोपीकडे पोलीसांनी सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने सदर घरफोडी केल्याची कबुली दिली. तसेच या व्यतिरिक्त पोलीस स्टेशन मौदा अप क्रं ५८७/२०२५ मधील फिर्यादीच्या घरातुन सुध्दा नमुद आरोपी ने १५,०००/— चोरी केल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली. नमुद आरोपीने अशा दोन घरफोड्या केल्याची कबुली दिली. मौदा पोलीसांनी नमुद आरोपीला अटक करून त्यांचे कडुन गुन्हयातील चोरीस गेलेली रोख रक्कम हस्तगत करण्यात केली आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे**

**१. पोलीस स्टेशन मौदा अप क्र ५८७/२०२५ कलम ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.स.**

**२. पोलीस स्टेशन मौदा अप क्रं ८१५/२०२५ कलम ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.सं**

## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ५ गुन्हे नोंद.

दिनांक ०६/१२/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, सडवा, दुचाकी वाहन तसेच इतर साहीत्य असा **एकुण १४,७८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन उमरेड येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापुर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे १ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ५ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत २८८० मिली देशी दारू, १३६ लीटर मोहाफुल दारू तसेच इतर साहीत्य असा एकुण १४,७८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६३५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०६/१२/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ६३५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण ११५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३३ आरोपी अशा एकुण ६५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २२ आरोपी अशा एकुण ११७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३९ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६३५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**




## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०५/१२/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०६/१२/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार,जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी करून संशयीत वाहनांना तपासण्यात आले.

सदर कोबिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी श्री पराग पोटे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले. सदर कारवाईत स्थानिक पोलीस स्टेशन येथील अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकचे पोलीस अंमलदार हजर होते.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने